**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१२६/२०१३</u>.**

आनंदराव जागरु जमाले व इतर विाा गणेश विष्णु तवर व इतर

CNR No.- MHST07-000846-2023

**<u>निशाणी क्र. १६४ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादींच्या वतीने मोजणी नकाशा, रे.दि.मु.नं.४९१/२०१६ मधील नि.१ ची प्रमाणित प्रत, आर.टी.एस. रिव्हीजन ०३/२०१९ व ३/२०१३ च्या निकालाच्या प्रमाणित प्रती तसेच आर.टी.एस.२०७/२०१७ च्या निकालाची प्रमाणित प्रत इ. कागदपत्रे दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. वादींच्या वतीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे. वादींच्या वतीने कथन आहे की, सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असुन वादींना मान्य व कबुल नाही. प्रतिवादींनी नमुद कागदपत्रांचा उल्लेख सविस्तर केलेला नाही. सबब, अर्ज रद्द करणेची विनंती केली आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

**<u>:: कारणमिमांसा ::</u>**

**<u>वादप्रश्न क्र.१ करीता</u> :-**

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दावा, साठेखतावरुन खरेदीखत होवुन मिळणेबाबत तसेच कायम व निरंतर ताकीदीकरिता आहे. दावा मिळकत स्थावर मालमत्ता आहेत. नियोजीत कागदपत्र प्रकरणाशी संबंधीत आहे. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता, उभय पक्षकारांनी

दाखल केलेली कागदपत्रे अभिलेखावर असणे जरूरीचे आहे. अर्ज मंजूर केल्यास वादींचे काही एक नुकसान होणार नाही. तथापि, उभय पक्षकारास पुरावा देण्याची संधी प्राप्त होऊन वादाचे निवारण होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींस नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जाऊन प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :–**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, दाव्याच्या प्राथमिक स्थितीत कोणा एका पक्षकारावर खर्च बसवणे न्यायाचे व योग्य नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीने, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

## आदेश

१) प्रतिवादींचा अर्ज निशाणी क्र. १६४ मंजूर करण्यात येतो.

२) या अर्जाचा खर्च अंतीम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.08.03 17:46:31 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :– ०३/०८/२०२६.

४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि. सातारा.